महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ CT 799774

// करारनामा //

हा करारनामा दि. १५/१०/२०२४ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मा. उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) सो., प्रसाद शिंगटे, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) जिल्हा- ठाणे, पिन कोड ४०११०१ यांच्यामार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज) इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल.

जोडपत्र - २ - 4 DEC 2024

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक ...022008..... दिनांक .....

दस्ताचा प्रकार ....Aff..... दस्त नोंदणी करणार आहे का ? होय/नाही

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव .....

हस्ते असल्यास त्याचे नाव ..... Harishchandra

पत्ता .....Bhy..... सही .....

मिळकतीचे थोडक्यात वर्णन .....

दुसऱ्या पक्षकाराचे नाव .....

मुद्रांक विक्रेत्याची सही (के. डी. चावंडे) ..... मुद्रांक शुल्क रक्कम ...500/-

मुद्रांक विक्रीचे ठिकाण / पत्ता - लक्ष्मी कॉम्प्युटर सेंटर, ७, न्यु नवरंग अपार्टमेंट, केबीन रोड, भाईंदर (पूर्व), ४०११०५. मुद्रांक परवानाक्र. १२०१०३०

KJM GROUP SYSTEM SOLUTIONS BHAYANDAR

4 DEC 2024

मे. के. जे. एम. ग्रुप सिस्टिम सॉल्युशन.., शॉप नं ३१, बिल्डिंग नं १, ओसवाल ऑरनेट ,जैन मंदिर समोर, जेसल पार्क, भाईंदर (पु.), महाराष्ट्र -४०११०५.यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल यामध्ये करारनामा होत आहे.

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी व नाविन्यता कक्ष यांना संगणक व इतर साहित्य खरेदी करणेकामी कंत्राटदार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईंदर महागनरपालिकेने दि.१५/१०/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी व नाविन्यता कक्ष यांना संगणक व इतर साहित्य खरेदी करणेकामी मान्यतेनुसार जाहिरात निविदा दरत्रक मागविण्या करिता जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदरचे काम करणेबाबत त्यांच्या दि.०३/१०/२०२४ रोजीच्या निविदेत सादर केलेल्या दरानुसार पुरवठा करणेस संमती दर्शविलेली आहे. सदरचा प्रस्ताव Annexure - A म्हणून संबोधण्यात येत आहे.

त्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशीलाचा विचार करुन व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाकरिता दिलेल्या संमतीनुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि. १५/१०/२०२४ रोजीच्या मंजुरी अन्वये व्दितीय पक्षीय यांना खालील अटीशर्तीस अधिन राहून संगणक व इतर साहित्य खरेदी करणे कामाचा करारनामा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. व्दितीय पक्षीय यांनी संगणक व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता Annexure - A मध्ये नमुद केल्यानुसार संगणक व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी-शर्तीनुसार करण्याचे मान्य केले आहे.
२. सदर कामाकरिता लागणारा आवश्यक तो कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था व्दितीय पक्षीय यांनी करावयाची आहे.
३. सदर संगणक व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता साहित्य पुरवण्याची जबाबदारी किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरी अथवा वाहन पुरवण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.
४. Bid/RA/ PR No GEM/2024/B/५२२५६०३ मधील अटीशर्ती पूरवठादारास बंधनकारक राहतील.
५. व्दितीय पक्षीय यांना पुरवठा केलेले संगणक व इतर साहित्यामधील Configuration मध्ये काही तफावत आढळल्यास, सदरचा संगणक व इतर साहित्य व्दितीय पक्षीय यांना परत करण्यात येईल व त्याऐवजी नमुद Configuration चे संगणक व इतर साहित्य पुरवठा दोन दिवसात (संगणक व इतर साहित्य परत केलेल्या दिवसापासुन) प्रथम पक्षीय यांना पुरवठा करणेस व्दितीय पक्षीय यांनी मान्य केलेले आहे.
६. व्दितीय पक्षीय संगणक व इतर साहित्य पुरवठा केले नंतर पुरवठा करण्यात आलेल्या संगणक व इतर साहित्याची तपासणी करुन त्याची गुणवत्ता, दर्जा, मापे, परिणाम याबाबत काहीही तक्रार उदभवल्यास त्याबाबत तक्रार दुर करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.
७. व्दितीय पक्षीय यांनी पुरवठा करण्यात येणा-या संगणक व इतर साहित्याची वॉरंटी ३ वर्षाची राहिल. सदर कालावधीत वॉरंटी नुसार संगणक व इतर साहित्या मधील Spare parts बदलून (Replace) देण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.
८. व्दितीय पक्षीय यांनी मागणी केलेल्या संगणक व इतर साहित्य पुरवठा केल्यानंतर दोन दिवसाच्या आंत सदर संगणक व इतर साहित्य Install करुन कार्यान्वित करुन देण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.
९. सदर कामासाठी द्वितीय पक्षीय यांनी महानगरपालिकेस सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम द्वितीय पक्षीय यांना दयावयाच्या देयकाच्या 2% दराने बॅक गॅरंटी च्या स्वरूपात प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा करण्याचे द्वितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे, सदरची सुरक्षा अनामत रक्कम पुरवठा केलेल्या संगणकाचा वॉरंटी कालावधी पूर्ण झालेनंतर द्वितीय पर्क्षीय यांच्या मागणीनुसार परतावा करण्यात येईल. बॅक गॅरंटी जमा न केल्यास व्दितीय पक्षीय यांच्या देयकातुन सदरची रक्कम कपात करणेत येईल.
१०. व्दितीय पक्षीय यांनी महानगरपलिकेने ठरविलेल्या एक महिन्याच्या मुदतीत (कार्यादेशातील नमुद मुदत) संगणक व इतर साहित्य पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. परंतु व्दितीय पक्षीय यांनी मुदतीत पुरवठा न

केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही ठेकेदाराकडून काम पुर्ण करुन सदर कामासाठी होणारा जादा आकार व्दितीय पक्षीय यांच्या जमा केलेल्या सुरक्षा अनामत रकमेमधून वसुल करण्यात येईल.

११. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षती झाल्यास व्दितीय पक्षीय क्षतीपुर्तीची हमी देत आहे.

१२. व्दितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेल्या काम करण्यास खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यास व्दितीय पक्षीय यांच्या सोबत केलेल्या करारनामा रद्द करुन व्दितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यास राहील.

१३. द्वितीय पक्षिय यांनी त्यांना नेमुन दिलेले **संगणक व इतर** साहित्य पुरवठा करण्याचे काम पुर्ण केल्यानंतर ठरवुन दिलेल्या मंजुर दरानुसार (Annexure - B) योग्य ते लेखी बिल महानगरपालिकेस सादर करतील. सदर बिलाची रक्कम प्रथम पक्षिय यांनी द्वितीय पक्षिय यांना देवु करेल. द्‌तीय पक्षिय यांना **संगणक व इतर साहित्य** पुरवठा कामासाठी देण्यात येणाऱ्या देयकामध्ये नियमाप्रमाणे देय असलेल्या सर्व कराचे समाविष्ठ आहे. सर्व शासकिय कर, वॅट प्रॉव्हीडन्ड फन्ड, किमान वेतन आयोगानुसार वेतन अन्य कर भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१४. द्वितीय पक्षिय **संगणक व इतर** साहित्य पुरवठा करण्याचे काम उप ठेकेदारास देता येणार नाही.

१५. करारातील अटी आणि शर्ती मुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षिय यांची राहील.

१६. **सदर मंजूर दरात ठेकेदारास दि.३१/०३/२०२६ या कालावधी पर्यंत संगणक पूरवठा करणे बंधनकारक राहील.**

१७. मुंबई मुद्रांक शुल्क कायदा अन्वये सदर करारनाम्यासाठी योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षिय यांची राहील.

वरील सर्व अटी शर्ती उभय पक्षिय यांना मान्य असुन त्याकरिता उभयपणे सहया करण्यात येत आहे.

प्रथम पक्षीय :-
मा. उपायुक्त (मु.) सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका.

द्वितीय पक्षीय :-

मे. के. जे. एम. ग्रुप सिस्टिम सॉल्युशन..,
शॉप नं ३१, बिल्डिंग नं १, ओसवाल ऑरनेट ,
जैन मंदिर समोर, जेसल पार्क,
भाईंदर (पु.), महाराष्ट्र -४०११०५.

KJM GROUP SYSTEM SOLUTIONS BHAYANDAR

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION Secretary Dept Head Office Bhaindar (W)

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन २०२४/२०२५ करारनामा नोंदवही
अनु क्र ७९३ दि. ४/७२/२४ अन्वये
नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

ANNEXURE – A

Sr.No	Item Description	QTY	मंजूर दर रु.	
			दर प्रति नग रु.	एकूण (रु.)
१.	**संगणक** (All in One) Make-HP (As per Specification)	२१९	रु.७४,३४०/-	रु.१,६२,८०,४६०/-
	TOTAL		**रु.७४,३४०/-** (GST सह)	**रु.१,६२,८०,४६०/०-** (GST सह)